# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

**संलग्न: सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन**
**पत्रव्यवहाराचा पत्ता:** ईशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगांव, अहमदनगर ४१४ ००१
**ई मेल:** cyclingassociationmaharashtra@gmail.com **मोबाईल क्र.** : ७३८ ५०८ १२७० ; ९४२ २३३ ६८०८
सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अंतर्गत नोंणी क्र: 694/16 & F/24689

**अध्यक्ष:** ॲड विक्रम रोठे **संघटन सचिव:** प्रताप जाधव **सचिव:** प्रा. संजय साठे **खजिनदार:** भिकन अंबे

## : अत्यंत महत्वाचे परिपत्रक :

## राष्ट्रीय MTB स्पर्धेसाठी निवड चाचणी स्पर्धा

दिनांक: १५ जोनेवारी २०२१

प्रति
मा. अध्यक्ष / मा. सचिव
सायकलींग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ला संलग्न
सर्व जिल्हा सायकलिंग असोसिएशन /
क्लब / सभासद / सायकलपट्टू

सस्नेह नमस्कार,

विषय: गदग, कर्नाटक येथे होणा-या १७वी राष्ट्रीय एमटीबी अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची सर्व वयोगटासाठी राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धा.

महोदय / महोदया,

कर्नाटक अम्यॅच्युअर सायकलिंग असोसिएशनतर्फे गदग येथे दिनांक १९ ते २१ फेब्रुवारी २०२१ दरम्यान १७ वी राष्ट्रीय एमटीबी अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धा सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडियाच्या मान्यतेने व सहकार्याने होत आहेत. या स्पर्धेमध्ये सहभागी होणा-या महाराष्ट्राच्या सायकलपटूंची निवड करण्यासाठी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या (CAM) वतीने रविवार, दिनांक २४ जानेवारी २०२१ रोजी सर्व वयोगटासाठी ईच्छूक सायकलपटूंची राज्यस्तरीय खुली निवड चाचणी स्पर्धा आळंदी, (देवाची), जिल्हा - पुणे येथे घेण्यात येणार आहे.

१) सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला (CAM) संलग्न असलेल्या जिल्हा सायकलिंग असोसिएशन मार्फत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे (CAM) सन २०२१ साठी नांव नोंदणी (Registration) केलेल्या सायकलपट्टूंस या निवडचाचणी स्पर्धेमध्ये भाग घेता येईल.
२) स्पर्धकांनी निवास व भोजन व्यवस्था स्वत:ची स्वत: करावयाची आहे. आळंदीमध्ये निवासाची सोय आहे.
३) सोबत दिलेल्या माहितीप्रमाणे वयोगट व निवडण्यात येणा-या सायकलपटूंची संख्या असेल.
४) सर्व वयोगटात वैयक्तिक टाईम ट्रायल प्रकारात निवड चाचणी घेण्यात येईल व सर्वाधिक कमी वेळेत अंतर पूर्ण करणा-या सायकलपटूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात येईल.
५) प्रत्येक सायकलपटूची सायकल स्वत:ची असली पाहिजे व हेल्मेट शिवाय निवड चाचणीमध्ये भाग घेता येणार नाही.
६) सर्व प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

७) वयोगटामधील सायकलपटूंनी आणि प्रथमच नोंदणी करणा-या सायकलपटूंनी वयाच्या पुराव्यासाठी शाळेचा दाखला किंवा नगरपालिका / महानगरपालिका / ग्रामपंचायत दाखला सोबत आणावा. **झेरॉक्स असेल तर ती राजपत्रीत अधिका-यांकडूनच साक्षांकित केलेली असावी. इतर कोणाचीही स्वाक्षरी ग्राह्य धरण्यात येणार नाही.**

८) भारतीय सायकलिंग महासंघ (सी.एफ.आय.) आणि CAM यांनी केलेल्या नियमांनुसार तसेच या नियमांत वेळोवेळी केलेल्या बदलानुसार ही निवड चाचणी घेण्यात येईल.

९) परीस्थीती व गरजेनुसार निवड चाचणीच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो जो सर्वांवर बंधनकारक राहील.

१०) निवड चाचणीमध्ये सर्व स्पर्धकांना स्वखर्चाने सहभागी व्हावे लागेल. कोणताही खर्च आयोजक / समिती उचलणार नाही. स्पर्धा नोंदणी / खर्च फी प्रत्येक ईव्हेंटसाठी रुपये ५००/- राहील. जी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या पुढील बँक खात्यात जमा करायची आहे. (रोख पैसे देऊ नयेत).

i) बँकेचे नांव : Bank of Maharashtra
ii) खात्याचे नांव : Cycling Association of Maharashtra
iii) खाते क्रमांक : 60307471103
iv) ब्रँच नांव : Pune Overseas, F C Road, Pune
v) IFSC Code : MAHB0001144
vi) खाते प्रकार : Saving

## सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे
## गुगल पे QR कोड पुढीलप्रमाणे



सायकलिंग असोसिएश ऑफ महाराष्ट्रकडे नांव नोंदणी केलेल्या खेळाडूंनाच या निवडचाचणी स्पर्धेत सहभागी होता येईल.

काही शंका असल्यास किंवा अधिक माहितीसाठी खालील सही करणार यांचेशी त्वरीत संपर्क साधावा.

कळावे, धन्यवाद !!

आपल विनीत

प्रा. संजय साठे
मानद सचिव

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:

१) ॲड. विक्रम रोठे .... अध्यक्ष, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

२) मा. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे

३) मा. प्राचार्य, पुणे क्रीडा प्रबोधिनी, पुणे

**State Level Open Selection Trials for All Age Group for**
**17th National MTB Championship 20-21**

Sunday 24th January 2021 at Alandi-Devachi, Dist. Pune

**अत्यंत महत्वाचे :** या सर्व स्पर्धांसाठी एमटीबी (MTB) कोणत्याही बनावटीची सायकल चालेल. **टायर जाड असले पाहिजेत पातळ किंवा हायब्रिड टायर चालणार नाहीत.**

**[पातळ किंवा हायब्रिड टायर असलेल्या खेळाडूस निवड चाचणीमध्ये सहभागी होता येणार नाही.] कृपया जिल्हा संघटनांनी आपल्या सायकलपटूंस सर्व माहिती द्यावी व सहकार्य करावे.**

**Event List with Age Group and Time Trial Laps for Trials**

| Sr. No. | Particulars | Age Group / Born In | Lap for Trials |
|---|---|---|---|
| I | ELITE MEN | 19 yrs & above<br>(Born in 2001 & before) | 2 Lap Time Trial<br>10 किमी. |
| II | ELITE WOMEN | 19 yrs & above<br>(Born in 2001 & before) | 1 Lap Time Trial<br>5 किमी. |
| III | MJ : Men Juniors | [Aged 17 & 18 yrs]<br>(Born in 2002 & 2003) | 2 Lap Time Trial<br>10 किमी. |
| IV | WJ : Women Juniors | [Aged 17 & 18 yrs]<br>(Born in 2002 & 2003) | 1 Lap Time Trial<br>5 किमी. |
| V | Sub – Junior Boys | [Aged 15 & 16 yrs]<br>(Born in 2004 – 2005) | 1 Lap Time Trial<br>5 किमी. |
| VI | Sub – Junior Girls | [Aged 15 & 16 yrs]<br>(Born in 2004 – 2005) | 1 Lap Time Trial<br>5 किमी. |
| VII | Youth Boys | [12 to 14 yrs]<br>(Born in 2006, 2007 & 2008) | 1 Lap Time Trial<br>5 किमी. |
| VIII | Youth Girls | [12 to 14 yrs]<br>(Born in 2006, 2007 & 2008) | 1 Lap Time Trial<br>5 किमी. |

- **सर्किटच्या अंतरानुसार एकूण अंतरामध्ये आयत्यावेळी बदल होऊ शकतो.**

**प्रा. संजय साठे**
**मानद सचिव**

निरोगी राहण्याचा एकच मंत्र, सायकल चालवण्याचे अवगत करा तंत्र